

तोडफोड करणाऱ्या गुंडांचा बंदोबस्त करा - अजित पवार

e Paper

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in शनिवार दिनांक 09/08/२०२५ METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 176 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com


# मुख्यमंत्र्यांच्या हस्ते पुणे पोलीस आयुक्तालयाच्या विविध प्रकल्पांचे उद्घाटन

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे : पोलीसांसमोराची आव्हाने, कायदा व सुव्यवस्थेचे नवे प्रश्न लक्षात घेवून ६० वर्षानंतर पोलीस दलाचा नवीन आकृतीबंध तयार करण्यात आला आहे. पोलीस स्टेशनची नवी रचना, नार्कोटीक्स, फॉरेन्सिक युनिट तयार करण्यात आले आहे. यापुढेही पोलस दल आधुनिक करण्यासाठी शासनातर्फे सर्व सहकार्य करण्यात येईल. तसेच पुणे शहरासाठी लोहगाव, लक्ष्मीनगर, नऱ्हे, मांजरी, येवलेवाडी अशा पाच पोलीस स्टेशनची मागणी केली असून त्यास मंजुरी देण्यात येईल. त्यासाठी लागणाऱ्या एक हजार मनुष्यबळाला मान्यता देण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

पोलीस मुख्यालय शिवाजीनगर येथे आयोजित पुणे शहर पोलीस आयुक्तालयाच्यावतीने शहरात




उभारण्यात येणाऱ्या विविध प्रकल्पांच्या भूमिपूजन आणि नवीन उपक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, अपर मुख्य सचिव (गृह) इक्बालसिंह चहल, पोलीस महासंचालक रश्मि शुक्ला, महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक अर्चना त्यागी, पुणे शहर पोलीस आयुक्त अमितेश कुमार, पोलीस सह आयुक्त रजंन कुमार शर्मा आदी उपस्थित होते.

पुण्याला दोन पोलीस उपायुक्त देण्याबाबत येत्या काळात मान्यता देण्यात येईल असे सांगून फडणवीस म्हणाले, शहरांचा विस्तार होत असताना पोलीस दलातही सुधारणा होणे गरजेचे आहे. एक नवीन पोलीस स्टेशनचे उद्घाटन आणि चार पोलीस स्टेशनचे भूमिपूजन करण्यात आले आहे. राज्य शासनाने शहरासाठी ७ पोलीस स्टेशन मंजूर करण्याची ही राज्यात पहिलीच वेळ आहे. पुणे शहराचा विस्तार आणि औद्योगिक-शैक्षणिक महत्व लक्षात घेता शहराची सुरक्षा व्यवस्था बळकट करण्यावर भर देण्यात येत आहे. पुणे शहरातील सीसीटीव्ही प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याचे उद्घाटन १० वर्षापूर्वी करण्यात आले होते.

या प्रणालीला आधुनिक तंत्रज्ञानाने सज्ज नियंत्रण कक्ष जोडला जाणे आवश्यक होते. या कक्षासह देशातील सर्वाधिक आधुनिक सीसीटीव्ही प्रणाली शहरासाठी सुरू करण्यात आली आहे.

यामुळे वाहतुकीवर प्रभावी नियंत्रणासोबत गुन्हे आणि परिस्थितीचे विश्लेषण करण्याचे काम कृत्रिम बुद्धीमत्तेच्या सहाय्याने करण्यात येईल. गुन्हेगारांचा तातडीने शोध घेण्यासाठी या यंत्रणेची मदत होणार आहे. गुन्हेगार आता पोलिसांच्या नजरेपासून वाचू शकणार नाही.

# पुणे जिल्ह्यात हिंजवडी, चाकणसह होणार तीन नवीन महापालिका!

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांची घोषणा !

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे : पुणे जिल्ह्यात चाकण, हिंजवडी आणि उरळी देवाची-फुरसुंगी-मांजरी अशा तीन महापालिका केल्या जाणार आहेत, अशी मोठी घोषणा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शुक्रवारी सकाळी केली. उपमुख्यमंत्री पवार शुक्रवारी सकाळी चाकण औद्योगिक क्षेत्राच्या दौऱ्यावर आहेत. त्यांनी चाकण औद्योगिक क्षेत्रातील नागरी समस्यांची पाहणी केली.

यावेळी बोलताना ते म्हणाले की, चाकणमध्ये नगरपरिषद असून या ठिकाणी विकासाच्या विकासावर मर्यादा येत आहेत. याच बरोबर हिंजवडीतही औद्योगिक क्षेत्राच्या विकासाला बंधने येत आहेत. यामुळे चाकण, हिंजवडीला नवीन महापालिका केल्या जाणार आहेत. याचबरोबर उरळी देवाची-मांजरी-फुरसुंगसाठी नवीन महापालिका केली जाईल. कोणाला आवडो न आवडो या महापालिका होणारच आहेत.

हिंजवडी आयटी पार्क, चाकण औद्योगिक क्षेत्रातील नागरी समस्या वारंवार समोर येत आहेत. या ठिकाणी होणारी वाहतूक



कोंडीची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत आहे. या समस्यांवरून राज्य सरकारवर टीकेची झोड उठली आहे.

यामुळे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी गेल्या महिन्यापासून दर आठवड्याला आयटी पार्क आणि चाकण औद्योगिक क्षेत्राची पाहणी सुरू केली आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पहाटेच चाकण औद्योगिक क्षेत्राची पाहणी केली. यावेळी त्यांनी औद्योग क्षेत्रातील वाहतूक कोंडीच्या समस्येचा आढावा घेतला.

# तोडफोड करणाऱ्या गुंडांचा बंदोबस्त करा - अजित पवार

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे : 'पुणे आणि पिंपरी चिंचवड शहरामध्ये टोळक्यांकडून कोयते उगारून दहशत माजविण्याचे प्रकार वाढीस लागले आहेत. तोडफोड करणाऱ्या गुंडांचा बंदोबस्त करायला हवा,' अशा शब्दांत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पोलिसांनी आदेश दिला.**



पुणे पोलीस आयुक्तालयातील विविध विकासकामांचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते शुक्रवारी शिवाजीनगर येथील पोलीस मुख्यालयात झाले. त्या वेळी बोलताना पवार यांनी ही सूचना केली.

ते म्हणाले, 'पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहराचा विस्तार होत आहे. कायदा-सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलिसांकडून महत्त्वाची भूमिका पार पाडली जात आहे. कायदा-सुव्यवस्था अबाधित राहिली पाहिजे. त्यासाठी आम्हीही सातत्याने प्रयत्नशील असून, जिल्हा वार्षिक योजनेला मंजूर केलेल्या २२ हजार कोटी रुपयांतील पाच टक्के रक्कम ही पोलीस दलासाठी राखीव ठेवली आहे.आतापर्यंत पुणे जिल्हा नियोजन समितीने ४० कोटी रुपये पोलीस दलाला दिले आहेत. त्यामुळे पाेलीस ठाण्यात दाखल होण्याऱ्या प्रत्येकाच्या तक्रारीचे निराकरण केले पाहिजे.'उच्च आणि तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, अप्पर मुख्य सचिव इक्बालसिंह चहल, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, अर्चना त्यागी, पोलीस आयुक्त अमितेश कुमार, पिंपरी-चिंचवडचे पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, सहपोलीस आयुक्त रंजनकुमार शर्मा या वेळी उपस्थित होते.

# मावळातील आरोग्य सेवांमध्ये पडणार मोठी भर

## वडगाव-कान्हे आणि लोणावळा उपजिल्हा रुग्णालयासाठी अत्याधुनिक सुविधा मंजूर

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**मावळ तालुक्यातील वडगाव-कान्हे आणि लोणावळा येथील उपजिल्हा रुग्णालयांच्या आरोग्य सेवा आणि पायाभूत सुविधांचा आढावा घेण्यासाठी आज महाराष्ट्र राज्याचे सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात आढावा बैठक पार पडली. या बैठकीस मावळचे आमदार सुनील शेळके यांची प्रमुख उपस्थिती होती.**



अधिकारी, परिचारिका आदी पदांवर भरती तात्काळ करण्याचे आदेश देण्यात आले, तसेच पदनिर्मिती संदर्भातील प्रस्तावावर आरोग्यमंत्र्यांनी त्वरित सही केली.या बैठकीस आरोग्य उपसचिव धुळे, आरोग्य संचालक अंबाडेकर, सहसंचालक डॉ. सुनीता गोल्हाईत, उपसंचालक नागनाथ यमपल्ले, सार्वजनिक बांधकाम उपअभियंता धनराज दराडे, वैद्यकीय अधीक्षक आणि इतर संबंधित अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत कान्हे उपजिल्हा रुग्णालयात सुरू झालेल्या प्राथमिक आरोग्यसेवांबरोबरच लवकरच येथे सिटी-स्कॅन, एम.आर.आय, कॅथलॅब यांसारख्या अत्याधुनिक सुविधा सुरू करण्यासंदर्भात निर्णय घेण्यात आला. आबिटकर यांनी यासाठी विशेष बाब म्हणून परवानगी देण्याचे निर्देश दिले असून, संबंधित प्रस्ताव तात्काळ सादर करण्याचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले.आमदार सुनील शेळके यांचा ठाम पाठपुरावा: मावळसाठी ठोस निर्णयया बैठकीत आमदार सुनील शेळके यांनी मावळ तालुक्यातील नागरिकांसाठी दर्जेदार आणि सुलभ आरोग्यसेवा उपलब्ध होणे अत्यंत गरजेचे असल्याचे स्पष्टपणे सांगितले. वडगाव-कान्हे आणि लोणावळा येथील रुग्णालयांमध्ये अनेक सुविधांची कमतरता असून, ती तातडीने भरून काढावी, अशी जोरदार मागणी त्यांनी केली.

त्यांच्या पाठपुराव्यामुळेच या महत्त्वाच्या सुविधांना मंजुरी मिळाल्याचे उपस्थित अधिकाऱ्यांनीही मान्य केले.लोणावळ्यातही डायलेसिस सेंटर आणि सिटी-स्कॅन सेंटर मंजूरलोणावळा उपजिल्हा रुग्णालयात डायलेसिस सेंटर सुरु करण्यास मान्यता देण्यात आली आहे, तसेच सिटी-स्कॅन सेंटरचे काम तात्काळ सुरु करण्याच्या सूचना आरोग्य मंत्र्यांनी दिल्या.

यामुळे परिसरातील गंभीर रुग्णांना पुण्याला जावे लागणार नाही, अशी नागरिकांमध्ये प्रतिक्रिया उमटली.रुग्णसेवेत अडथळा ठरणारी रिक्त पदे भरण्यासाठीही ठोस पावले उचलण्यात आली. वैद्यकीय

मावळ तालुक्यासाठी ही बैठक ऐतिहासिक ठरली असून, आमदार सुनील शेळके यांच्या सक्रिय सहभागामुळे आणि पाठपुराव्यामुळे आरोग्य सेवांच्या विस्ताराला नवा आयाम मिळाला आहे. हे निर्णय प्रत्यक्षात आल्यास ग्रामीण भागातील रुग्णांना अत्यावश्यक वैद्यकीय सेवा स्थानिक स्तरावरच उपलब्ध होतील, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

# पिंपरी चिंचवड उद्योग कक्षाची बैठक यशस्वीरित्या संपन्न

>>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



**पिंपरी चिंचवड उद्योग कक्षाची बैठक क प्रभाग क्षेत्रीय कार्यालयात शुक्रवार (दि.०८) रोजी पार पडली. या बैठकीत फोरम ऑफ स्मॉल स्केल इंडस्ट्रीज असोसिएशनचे अध्यक्ष अभय भोर यांनी औद्योगिक परिसरात कचरा व्यवस्थापन वाहन आणि मनुष्यबळ वाढविण्याचे मागणी केली.**

संपूर्ण परिसरात झाडलोट होणे गरजेचे आहे आणि कचरा नियमित उचलला जावा तसेच एमआयडीसी परिसरातील विविध मूलभूत सुविधांविषयी चर्चा करण्यात आली.

बैठकीत स्वच्छता व्यवस्थापन, सुलभ सार्वजनिक शौचालयांची गरज आणि औद्योगिक क्षेत्रातील सुविधा वाढवण्याबाबत विविध निर्णय घेण्यात आले. औद्योगिक क्षेत्र स्वच्छ व सुसज्ज ठेवण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्था आणि संबंधित अधिकाऱ्यांशी समन्वय ठेवून ठोस कृती करण्याचे ठरवले.यावेळी उपायुक्त पो.म.न, उपायुक्त सचिन पवार , क प्रभाग क्षेत्र अधिकारी येळे ,विजय वावरे एमआयडीसी विभागाचे पदाधिकारी उपस्थित राहिले.

यावेळी त्वरित तक्रारींची दखल घेण्यात येऊन पवार यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना सूचना केल्या आणि परिसरामध्ये मनुष्यबळ आणि गाड्या याची संख्या वाढविली असल्याचा खुलासा केला आणि पुढील काळात एमआयडीसी मधील स्वच्छतेवर जास्त भर देऊन यासाठी एक क्यूआर कोड जनरेट करण्यात आला आणि तो क्यूआर कोड उद्योजकांना देण्यात येणार असून त्या क्यूआर कोड द्वारे परिसरातील स्वच्छता राखण्यात मोलाची मदत होणार आहे असे सांगितले. बैठकीत उपस्थित सर्व उद्योजकांनी सकारात्मक प्रतिसाद देत या उपक्रमाला सक्रिय पाठिंबा दर्शविला.

# बाराव्या विश्वबंधुता विद्यार्थी व शिक्षक साहित्य संमेलनाचे उद्घाटन

>>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



**पिंपरी : "सुसंस्कृत समाजाच्या योगदानातून राष्ट्राची उन्नती होत असते. त्यासाठी तरुण पिढीमध्ये बंधुभाव रुजायला हवा. बंधुता मूल्यातून एकोप्याची भावना, सुदृढ समाजाची निर्मिती होत असते. त्यामुळे शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये बंधुत्व मूल्याचे महत्व रुजण्यासाठी प्रयत्नशील असावे," असे प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेचे सहसचिव डॉ. शिवलिंग मेनकुदळे यांनी केले.**

विश्वबंधुता साहित्य परिषद व रयत शिक्षण संस्थेचे पिंपरी येथील महात्मा फुले महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित बाराव्या विश्वबंधुता विद्यार्थी व शिक्षक साहित्य संमेलनाचे उद्घाटन डॉ. मेनकुदळे यांच्या हस्ते झाले. प्रसंगी विश्वबंधुता साहित्य परिषदेचे संस्थापक अध्यक्ष बंधुताचार्य प्रकाश रोकडे, संमेलनाध्यक्ष, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. अविनाश सांगोलेकर, स्वागताध्यक्ष डॉ पांडुरंग भोसले, कवी डॉ. अशोककुमार पगारिया, साहित्यिक प्रा. शंकर आथरे, कवयित्री संगीता झिंजुरके आदी उपस्थित होते. बंधुता गुणवंत पुरस्कारांचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

डॉ. शिवलिंग मेनकुदळे म्हणाले, "देशाचा उभारणीत योगदान देणाऱ्या विद्यार्थ्यांपर्यंत संस्काराची शिदोरी पोहचवणारा शिक्षक असतो. मोबाईल, इंटरनेटच्या विळख्यात सापडलेल्या तरुणाईला बाहेर काढण्यासाठी मार्गदर्शन करायला हवे. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून संस्कार, मूल्ये रुजवली. हीच शिकवण पुढील पिढीला देण्यासाठी प्रयत्नशील आहे.

तंत्रज्ञानाचा योग्य वापर कसा करावा याबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून त्यांना देशाचा उभारणीत योगदान देण्यासाठी प्रेरित करण्याची आज आवश्यकता आहे."

डॉ. अविनाश सांगोलेकर म्हणाले, "बंधुता ही केवळ राजकारण किंवा सामाजिक व्यवहारापुरती मर्यादित नसून ती शिक्षण आणि साहित्य या दोन्ही क्षेत्रांमध्येही आवश्यक आहे.

शिक्षण आणि साहित्य हे समाजाला जोडण्याचे आणि विचार समृद्ध करण्याचे महत्त्वाचे साधन आहे. या दोन्ही क्षेत्रांत बंधुतेची भावना रुजल्यास समाजातील सर्व स्तरांतील लोक एकत्र येऊन प्रगती साधू शकतील.

शिक्षकांनी केवळ विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमावर आधारित ज्ञान देऊ नये, तर समाजात वावरताना येणाऱ्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी त्यांना नैतिक आणि सामाजिक मूल्यांचेही शिक्षण द्यावे."

बंधुताचार्य प्रकाश रोकडे, प्रा. शंकर आथरे यांनीही मनोगत व्यक्त केले. डॉ. पांडुरंग भोसले यांनी स्वागतपर मनोगत केले. संगीता झिंजुरके यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सुहास निंबाळकर यांनी आभार मानले.

# शहरात पुन्हा सुरु होणार आयुर्वेद आणि होमिओपॅथी ओपीडी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड: आमदार अमित गोरखे यांच्या पाठपुराव्यानंतर पिंपरी-चिंचवड शहरातील नागरिकांना आता महापालिकेच्या रुग्णालयांमध्ये पुन्हा एकदा आयुर्वेद आणि होमिओपॅथी उपचार मिळणार आहेत. महापालिका प्रशासनाने शहरातील तीन रुग्णालयांमध्ये या ओपीडी (OPD) तातडीने सुरू करण्याचे निर्देश दिले आहेत.**



यापूर्वी वायसीएम रुग्णालयातील आयुर्वेदिक ओपीडी बंद झाल्याने नागरिकांची गैरसोय होत होती. आमदार गोरखे यांनी विधानपरिषदेमध्ये लक्ष वेधले होते, आयुक्तांनी देखील या संदर्भात प्रामुख्याने लक्ष घातले होते. या मागणीनंतर झालेल्या मा. आयुक्तांच्या बैठकीत आयुक्तांनी सकारात्मक प्रतिसाद देत तातडीने कार्यवाहीचे आदेश दिले आहेत. यामुळे नागरिकांना आता स्वस्त आणि सोप्या पद्धतीने उपचार मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. त्याचबरोबर निगडी-दापोडी अर्बन स्ट्रीट प्रकल्पातील निकृष्ट कामाची चौकशी करून दोषींवर कारवाईची मागणी केली. तसेच, शहराच्या प्रारूप विकास आराखड्यातील आरक्षण बदलांवर आक्षेप घेत आराखडा नव्याने तयार करण्याची मागणी केली.याशिवाय, श्वान हल्ले आणि पशुवैद्यकीय विभागातील भ्रष्टाचारावर तातडीने उपाययोजना करणे, तसेच सांस्कृतिक कार्यक्रम अचानक रद्द होण्यावर आळा घालण्यासाठी धोरण ठरवणे यासारख्या मागण्याही त्यांनी केल्या. या सर्व विषयांवर आयुक्तांनी सकारात्मक प्रतिसाद देत संबंधित अधिकाऱ्यांना कार्यवाहीचे आदेश दिल्याचे आमदार गोरखे यांनी सांगितले. स्वच्छ सर्वेक्षण २०२४ मध्ये शहराला मिळालेल्या यशाबद्दल त्यांनी आयुक्त व महापालिका कर्मचाऱ्यांचे अभिनंदनही केले

# महानगरपालिका सेवक पतसंस्थेच्या चेअरमनपदी शिवाजी येळवंडे!

## तर व्हाईस चेअरमनपदी ज्ञानेश्वर शिंदे यांची निवड

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



संस्थेच्या सन २०२३-२०२८ या पंचवार्षिक निवडणुकीमध्ये संचालकांमधुन दिनांक ०७/०८/२०२५ रोजी झालेल्या संचालक मंडळ सभेत पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवक पतसंस्थेच्या चेअरमनपदी शिवाजी बाजीराव येळवंडे, व्हाईस चेअरमनपदी ज्ञानेश्वर मारुती शिंदे, सचिव पदी विश्वनाथ जगन्नाथ लांडगे व खजिनदार पदी अभिषेक नथुराम फुगे यांची निवड मा. पंकज राऊत-निवडणुक निर्णय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, पुणे शहर-१ यांचे अध्यक्षतेखाली व पिंपरी चिंचवड मनपा कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष मा. शशिकांत उर्फ बबनराव झिंजुर्डे यांच्या मार्गदर्शनाखाली एकमताने करण्यात आली.

यावेळी संस्थेचे पदाधिकारी व विद्यमान संचालक यांनी अध्यक्ष शशिकांत उर्फ बबनराव झिंजुर्डे यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेचा कारभार हा विनम्र आणि तत्पर सेवा व पारदर्शक व्यवहार व्यवस्थित रित्या चालविण्याचा संकल्प केला आहे. तसेच सभासदांना बचतीच्या सवयी लागण्यासाठी ठेवीवर जास्तीत जास्त ९% व्याज व कन्यादान ठेवींवर १०% ते १०.५०% व्याजदर करून संस्था स्वभांडवलावर उभी करण्याचे धोरण ठरविले आहे.तसेच सभासदांना कमीतकमी ११ टक्के व्याजदराने कर्ज पुरवठा करून सभासदांची आर्थिक अडचणी दूर करणार आहेत. तसेच मा. अध्यक्ष बबनराव झिंजुर्डे यांनी केलेली संस्थेची १६ वर्षपूर्वीची वार्षिक उलाढाल रु.१७ कोटीच्या आसपास होती आता २९ वर्षात संस्थेची वार्षिक उलाढाल रु. २०३ कोटीच्या वर झाली आहे. व कर्ज मर्यादा रु. ५० हजारावून रु. २० लाखापर्यंत वाढविले असून त्वरीत मंजूर व गतिमान वितरण करत आहे. त्याची थकबाकी ०.५०% इतकी आहे. यावरुन संस्थेची आर्थिक स्थिती पाहता संस्थेला सतत 'अ' वर्ग दर्जा मिळालेला आहे. संस्था स्थापनेपासून सलग ५० वर्ष नफा मिळवून नफ्यातून सभासदांना जास्तीत जास्त १४% / १२% लाभांश वाटप करत आहे. तसेच सभासदांना आरोग्याचे निदान त्वरीत लक्षात यावे करिता वैदयकिय किट वाटप केले आहे. तसेच संस्थेच्या मयत सभासदांचे कर्ज माफ करणारी महाराष्ट्रातील पहिली पतसंस्था आहे. सतत सभासदांच्या हितासाठी व तत्पर सेवेसाठी सदैव आग्रही आहे. संस्थेच्या आर्थिक उलाढाली मध्ये अधिकाअधिक वाढ करणेचे व सभासदांच्या अडचणी दूर करणेचे संस्थेच्या नवनिर्वाचित पदाधिकारी व संचालक मंडळाने एकविचाराने केला आहे.यावेळी संस्थेचे विद्यमान संचालक व माजी पदाधिकारी चारुशिला जोशी, सनी कदम, नथा मातेरे, भास्कर फडतरे, चंद्रकांत भोईर, विजय नलावडे, विजया कांबळे, विशाल भुजबळ, अनिल लखन, संदीप कापसे, कृष्णा पारगे, विजय मुंडे, वैभव देवकर, योगेश रानवडे, गणेश गवळी, युनुस पगडीवाले व संस्थेचे सल्लागार मनोज माछरे, नितीन समगीर, महादेव बोत्रे, दिगंबर चिंचवडे, लाला गाडे, संजय कापसे, मंगेश कलापुरे, उमेश बांदल, चंद्रशेखर गावडे, विशाल बाणेकर सूरज टिंगरे व नवनिर्वाचित सल्लागार किशोर आठवाल, गौतम पायाळ, भाऊसाहेब शेलार, राकेश चव्हाण, गौतम भालेराव व तसेच महासंघाचे सर्व पदाधिकारी व सदस्य मोठ्या संखेने उपस्थित होते.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968